# हुसनापूर पंचायतीतील रामपूर, हमदापूर, लालखेडा, व बारह ही गावे ग्रामदान झाली


साम्ययोग : दैनिक पुरवणी

# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक : ४९] सेवाग्राम, सोमवार ता. ४ मे १९६४ [मूल्य ५ न. पै.


## कचखाऊ नेतृत्व

विनोबांची दुसरी भारत प्रदक्षिणा २१ एप्रिल पासून वर्धा जिल्ह्यापासूनच सुरू झाली आहे. नदीचा उगम जितका सामर्थ्यवान असेल तितके नदीचे महात्म्य वाढत असते. वर्धा जिल्हा हा भारतात सामर्थ्यशाली जिल्हा आहे. येथील जनता सुजाण आहे. त्यांनी आपल्या विनोबाचे महात्म्य व ह्या कार्याचे महत्व ओळखले आहे. विनोबा ज्या ज्या गावात जातात त्या त्या गावात जनता त्यांच्या स्वागतासाठी व त्यांचा संदेश जीवनात उतरविण्यासाठी आतुर दिसते. अगोदरच पूर्वतयारीसाठी फिरलेल्या कार्यकर्त्यांनी सभा बैठकी चर्चा करून विचार लोकांना पटविलेला असतो आणि विनोबांचे दर्शनाचाच अवकाश की लोक गहिवरून जातात व त्यांना प्रेमाचा पान्हा सुटतो. मालकीचा व स्वार्थाचा खडक फुटून करुणेची धारा वाहू लागते. गरीब व सधन, शिकलेले व बिनशिकलेले पुढारलेले व मागासलेले लोक ग्रामदान करायला तयार होतात. लहान व मोठी गावे हाहि भेद येथे आडवा येत नाही. मोठ्या प्रमाणावर लोक ग्रामदान पत्रावर भराभर सह्या करू लागतात आणि ज्या गावात लोककल्याणकारी नेतृत्व असते त्या गावात काम लवकर पूर्ण होते व ते गाव ग्रामदान जाहीर होते.

परंतु ज्यांना टाटा बिर्ला बनण्याची महत्वाकांक्षा आहे, दिल्ली, मुंबईच्या सिंहासनाची लालसा आहे अशी महत्वाकांक्षी मंडळी लोकांच्या भावना ओळखू शकत नाहीत. काय घाई आहे? उद्या करून चालणार नाही का? अशा तऱ्हेची टंगळ मंगळ करून ते कालहरणाचा प्रयत्न करीत आहेत. गावातील पटबाजीचे आखाड्याचे म्होरकेहि साशंक दिसतात. परंतु ग्रामदानाचा संकल्प करणे म्हणजे मागील हे सर्व विसरून नवीनरस्ता स्वीकारणे हे त्या पैकी काहींच्या लक्षात येत नाही. व ती गावे मागे रखडतात. जसे नवबौद्ध होण्यापूर्वी महार मंडळी मोठ्या प्रमाणावर मांसाहार करीत होती. परंतु बुद्ध धर्माचा स्विकार म्हणजे मांसाहाराचा परित्याग ही भावना त्यांनी उचलली, बुद्ध धर्माचा स्विकार म्हणजे उच्छिष्ट भोजन व मेलेल्या गुरांचे मांसाचा लोभ सोडणे हे त्यांनी ओळखले. व त्यांच्या जीवनाची कळा बदलली. उपवासाची कड सोसून त्यांनी स्वाभिमानावर आपल्या जीवनाची उभारणी केली.

गांधीजींनी व टिळकांनी स्वदेशीचा मंत्र देशाला दिला आणि इंग्रजांची नोकरी व इग्लंडचा माल हा त्याज्य ठरला. साधा स्वयंसेवक हा गव्हर्नरपेक्षा मोठा ठरला व जाडी भरडी खादी मलमलपेक्षा मोलाची ठरली व राजबिंड्या सधन सुखवस्तु घराण्यांनी तिचा स्विकार केला व त्यातून नेहरू, वल्लभभाई, राजेंद्रबाबू, राजगोपालाचारी, चित्तरंजनदास, लजपतराय इ. नेते प्रगट झाले. त्यांचे जीवन पालटले म्हणून देशाचे जीवन पालटले. आमचे आम्ही सोडणार नाही व देशहि बदलला पाहिजे ही वृथा धारणा त्यांनी ठेवली असती तर देश कधीच उभा झाला नसता. पण तो आता जुना काळ झाला. आता नव्याने देश उभा करायचा आहे.

व्यक्तिगत स्वार्थाच्या जागी सामाजिक सौख्य व व्यक्तिगत महत्वाकांक्षेच्या जागी सामाजिक हित आम्हाला आणायचे आहे. त्यात आमचेहि कल्याण येऊनच जाते. पण आजच्या काही नेत्यांच्या मनात आम्ही आमचे स्वतःचे उत्पन्न वाढवू व आमच्या मुलांना जगाच्या स्पर्धेत वर आणू अशी लालसा प्रगट होत आहे. ह्या चढाओढीत व्यक्तिशः ते हारतील की मार खातील ते काळच दाखवील परंतु ह्या स्पर्धेने समाजाचे शकले करण्याचे पातक त्यांच्या नशीबी येईल. गेल्या सोळा वर्षात बेकार विषमता व फूट ह्यांचे जे अमाप पिक पिकले ते वरील प्रकारच्या मनो-भूमिकेतच पिकले आहे. स्वतःला थोडी अनुकूलता प्राप्त होताच परदुःख शीतल झाल्याने समाजाची प्रगति कधीच होणार नाही.

विनोबा ज्या ज्या गावात जातात त्या त्या गावात लोकांचे मोठ्या प्रमाणावर सहकार्य लाभत आहे. लोकाबद्दल कळकळ बाळगणारे ग्रामीण नेतृत्व ग्रामदानात पुढाकारहि घेऊ लागले आहे. तालुका, जिल्हा पातळीवरील नेतृत्वानेहि उत्साहाने ह्यात भाग घेण्याची वेळ आली आहे.

विनोबा फार काळ एका जिल्ह्यात राहू शकत नाहीत. गांधीजींच्या नावावर सरकारी, बिनसरकारी नानाप्रकारच्या योजना व सवलती आपण वर्धा जिल्ह्यासाठी घेत आहोत. तेव्हा गांधीजींचे अपूर्ण काम-ग्रामस्वराज्याचे स्वप्न-आपल्याला पूर्ण करायचे आहे.

लोकशाही समाजवाद आपल्या स्वतःच्या जीवनात उतरवायचा आहे. तो आपल्या गावात आणायचा आहे. 'ग्रामदान' हा खेड्यातला समाज वादाचा नमुना आहे व 'ग्रामसभा' ही लोकशाहीचा खराखुरा आदर्श आहे.

ज्याची ज्याची लोकशाही समाजवादावर निष्ठा आहे त्यांची कसोटी विनोबाच्या पदयात्रेमुळे लागत आहे. विनोबा आपल्या मदतीसाठी भरदुपारच्या उन्हात बारा वाजता आपल्या घराला भेटी देतात ह्याचा अर्थ आम्ही ध्यानात घेऊ का?

विनोबांनी ह्या भागातील जनतेची ह्या विचारा बाबत प्रीति पाहून आणखी वेळ देण्याचे ठरविले आहे. संबंध देवळी ब्लॉक व वायफड विरूळ विभाग हे प्रथम कार्यक्षेत्र निवडले आहे. देवळी ब्लॉक मधील अनेक गावात प्रचंड उत्साहाने कामाला प्रारंभ झाला आहे. विनोबा आणि कार्यकर्ते आणि खेड्यात राहणारे लोकनेते ह्यांनी आपली शक्ति ह्या भागात लावली आहे. लोकमताने कौल दिला आहे. पुरुषार्थी लोक तर केव्हाच आघाडीवर आले आहेत. तालुका, जिल्ह्याचे नेतृत्व कच खाऊ लागले. तर त्याचा कामावर काहीसा प्रतिकूल परिणाम होईल. पण त्यापेक्षा जिल्ह्याचे अनहित अधिक होईल. देव द्यायला आला पण घेणारा झोपला होता अशी पाळी आमच्यावर न येवो. मध्यमवर्गीच लोक श्रीमंताचा मत्सर न करता स्वतःचा स्वार्थ बाजूला सारुन देशातील तमाम सामान्य जनतेला वर उलचण्यासाठी खाली किती वाकू शकतात ह्यावर देशाच्या व जिल्ह्याच्या प्रगतीचे योजमाप अवलंबून आहे.

आणि ग्रामदान नेमके तेच शिकवीत आहे. व्यक्तिगत विचार करण्याची पद्धति टाकून सामाजिक चिंतनाची संवय लावणे, सामुदायिक पुरूषार्थ करणे हाच समाजवादाची व लोकशाहीचा गाभा आहे.

१९२१, १९४०, १९४२ व १९५७ च्या चळवळी प्रमाणे ह्या जिल्ह्यात परत आता हे नवीन आंदोलन सुरु झाले आहे. विनोबा म्हणतात 'मी वर्धा जिल्ह्यात माझे नशीब अजमावणार आहे. तुम्ही मदतीला या अगर नका येऊ मी दोन महिने देणार. येवढा पक्षपात करणार व तुम्ही वर्धा जिल्हा सर्वोदयी जिल्हा करण्याचा संकल्प कराल व चारहि बाजूंनी धावून याल तर मी अधिकहि वेळ देईल."

मागील लढ्यात पराक्रम गाजविलेले अनेक कार्यकर्ते-रचनात्मक व राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात काम करणारे-येथे आहेत. तेव्हा ते जर तत्परतेने धावून आले तर विनोबांना मोठा आधार होईलच पण शिवाय जिल्ह्यातहि प्रचंड काम होईल. विनोबांच्या ह्या आवाहनावरून रचनात्मक कार्यकर्त्यांनी आपली अधिकाधिक शक्ति लावण्याचा निर्णय घेतला आहे. आणि अशा तऱ्हेने ग्रामदान गंगेला उगमाजवळ जर भरपूर बळ मिळाले तर महाराष्ट्रात तिचा प्रचंड प्रवाह बनेल.

म्हणून वर्धा जिल्ह्यावर दुहेरी जबाबदारी आहे. एकतर गांधीजीशी इमान पाळायचे आहे व महाराष्ट्राच्या कामाला बळ द्यावयाचे आहे.

मोठ्या पुढाऱ्यांनी बाहेरील दौरे रद्द करावे, येथल्या झाडून साऱ्यांनी कामाला लागावे व बाहेरच्या प्रभावी लोकांनीहि जिल्ह्यात मदतीला यावे अशी वेळ आली आहे.

—वसंत बोंबटकर


www.vinoba.in

# चिकनी ग्रामदानाची कहानी

वर्धा तहसिलीत चिकनी हा मोठा संघटीत गाव आहे. पू. विनोबांच्या पदयात्रेच्या निमित्ताने ग्रामदानाचा विचार समजावून सांगण्यासाठी या गावी जायला मला सांगण्यात आले. सोबत श्री. जानराव राऊत होते. गावात आम्ही सकाळीच पोचलो. दुपारी प्रमुख ग्रामस्थांची चर्चा सभा झाली. सर्व विषय समजावून देण्यात आला व ज्यांना हा विचार मान्य असेल त्यांनी ग्रामदान पत्रावर सह्या कराव्यात असे सुचविले गेले. सारे प्रमुख बसले होते. श्री. विठ्ठलराव नाईकवाड म्हणाले यात सर्वांचे भले आहे माझी पहिली सही घ्या आणि मग सुरेभान सावळे, सरपंच रामराव घोडे आदींच्या सह्या घ्या. पटवारी श्री. धमाणे सभेला हजर होते. ते सेवाग्रामच्या नई तालीमचे विद्यार्थी. त्यांच गाव म्हसाळ ते पूर्वीच ग्रामदान झालेले. त्यानी ग्रामदान पत्रावर सही केलेली लोक सह्या करायला लागलेले पाहून ते हळूच म्हणाले माझे गाव ग्रामदान झालेले आहे मी सही दिली आहे. तुम्ही कराल तर चांगलेच होईल.

रात्री जाहीर सभा घेऊन हा विचार सर्वांना समजावून सांगावा असे ठरले. लोक सभेच्या तयारीला लागले. गावात ग्रामदानाची चर्चा सुरू झाली. जाहीर सभेत विषय विस्ताराने समजावून देण्यात आला. सभेनंतर अनेकांनी ग्रामदान पत्रावर सह्या दिल्या. गावची बुद्ध मंडळी सभेला हजर होती. सभेनंतर त्यांच्यापैकी काहीजण म्हणाले, आम्हाला ग्रामदान पत्र द्या. आम्ही आमच्या पैकी सर्वांच्या सह्या घेतो. रात्र बरीच झाली होती म्हणून सकाळी काम करायचे ठरले.

### नवबौद्धांचा उत्साह

सकाळी लवकर नवबुद्धांपैकी एक आले व फॉर्म घेऊन गेले. इतर प्रमुख गावकऱ्यांनी दोन टोळ्या केल्या व ज्यांच्या सह्या झाल्या नव्हत्या त्यांच्या घ्यायला सुरुवात केली. दुपार पर्यंत बहुतेक काम पुरे झाले. ३–४ मोठी मंडळी राहिली त्यांना तुम्ही समजावून सांगायला या असे गांवकरी म्हणाले. श्री. प्रभाकर देशमुख तरुण ग्रामस्थ. त्यांची सत्तर एकर जमीन. परगावी गेल्यामुळे ते कालच्या सभेला हजर नव्हते. त्यांना सर्व समजावल्यावर त्यांनी सही दिली. त्यांचे वडील पूर्वीचे मोठे कार्यकर्ते. कै. जमनालालजी बरोबर त्यांनी काम केलेले. त्यांचा आशीर्वाद मिळाला. दुसरे एक गृहस्थ वृद्ध अनुभवी शेतकरी सह्या करायला अनमान करत होते शेवटी त्यांनी आपण होऊन सही दिली.

हा गाव ६९६ लोक संख्येचा आहे जमीन १६०० एकर आहे. १३० कुटुंबे आहेत. गावात असलेल्या सर्वांच्या सह्या मिळाल्या. गावकऱ्यांनी एकमेकांना विचार समजावला. एक नवीन दर्शन या गावात झाले. पू. विनोबाजी जे विचार मांडतात ते विचार लोक सहज अमलात आणू शकतील. मात्र त्यांच्यापर्यंत पोहचलेच पाहिजे.

—गोविंदराव शिंदे

# पहाटे चार वाजता विनोबांच्या दर्शनासाठी सगळे बाभुळगाव लोटले

सकाळच्या मंगल प्रहरी मुले बाळे, बायका, पुरूष मंडळी, जवळ जवळ सबंध गाव या ठिकाणी बसले आहे. तुमच्या दर्शनाने मला फार आनंद होत आहे. या गावात भूदानहि चांगले मिळाले आहे. आणि विसावा हिस्सा जमीन आम्ही ग्रामदानात मागत असतो. येथे आधीच पुष्कळ एकर जमीन वाटली आहे. आता आणखीन पंचवीस–एकर जमीन द्यावी लागेल पण ग्रामदान म्हणजे गावाला मजबूत करणे. त्यासाठी गावाची जमीन गावात राहिली पाहिजे. आपल्या देशाची थोडी जमीन चीनच्या हातात गेली तेवढ्यासाठी लढाई चालू आहे. आठशे कोटी रूपयांचा सरकार त्यावर खर्च करीत आहे देशाची जमीन देशाच्या बाहेर असणे इष्ट नाही ताच न्याय गावाला लागतो. गावाची जमीन गावाच्या बाहेर राहिली तर कोणचीहि योजना सफल होत नाही. गाव मजबूत राहिला नाही, तर सरकार कमजोर होते.

तुम्ही काय करता ? जमीन आणि जमिनीची मालकी दोन्ही हातात ठेवण्याचा प्रयत्न करता. पण त्यामुळे जमीनहि जाते आणि मालकीहि जाते. वाटखेडे गावाची गम्मत तुम्हाला सांगतो. तेथे पंच्याण्णव जमीनीचे मालक गावात आहेत आणि पंचावन बाहेर आहेत. म्हणजे इतक्या जमिनी बाहेरच्या लोकांना विकल्या. अशा रीतीने जमीन गावाच्या बाहेर चालली आहे मी त्यांना सांगितले की, आताच सावध झाला तर आहे तेवढी जमीन शिल्लक राहील. नाही तर हळू हळू सर्व जमीन गावच्या बाहेर जाईल. जमीन गेली की, तुम्हाला नोकऱ्या कोण देणार ? म्हणून जमिनीची मालकी तुम्ही आपल्या हाताने पकडू शकत नाही कारण तुमचे हात इतके मजबूत नाहीत. ग्रामसभेचे हात मजबूत असतात. तिला मालकी सोपवा आणि तुम्ही जमीन पकडून ठेवा तरच तुम्ही जमीन विकू शकणार नाही. गहाण ठेवू शकणार नाही व जमीन गावाच्या बाहेर जाणार नाही. विसावा हिस्सा जमीन भूमिहिनांना द्या व आपल्या आमदनीचा चाळीसावा हिस्सा ग्रामसभेला द्या. चाळीसावा हिस्सा पिकावर मोजणे कठीण जात असेल तर तो एकरावर मोजावा. पण गावात अखंड दानधारा वाहिली पाहिजे. असे हे साधे सरळ काम आहे.

कम्युनिस्ट म्हणतात सर्व जमीन सरकारची व्हावी. भांडवलदार म्हणतात, जमीन व्यक्तीची असावी. सरकारची जमीन झाली की, शेतकरी सगळे मजूर होणार, गुलामी वृत्ती वाढणार हा प्रयोग रशियात झाला व तेथे धान्याचे पीक वाढले नाही. रशियाला आता अमेरिकेतून धान्य मागवावे लागते. व्यक्तीची जमीन म्हटली की ती विकली जाणार. आणि गावाच्या बाहेर जाणार. म्हणून ग्रामदानाचा विचार आम्ही सांगितला. जमीनीची मालकी गावाची असावी. सरकारचीहि नाही व व्यक्तीचीहि नाही.

बाभुळगाव,
२८।४।६४
रस्त्यात पहाटे चार वाजता

# सोरटा गावात पूज्य विनोबा भावे यांचे शुभागमन



जवळ जवळ १४ वर्षांनी पूज्य विनोबाजो भारताचो पहिली प्रदक्षिणा संपवून पुन: वर्धा जिल्हयांत आलेले आहेत. सोमवार दि. ११-५-१९६४ रोजी सकाळी ६ वा. ते रसुलाबाद मार्गे सोरटा येथे येत आहेत. हया प्रसंगी पूज्य विनोबासारख्या महान विभूतीचे भव्य स्वागत करावे अशी आमची हार्दिक इच्छा आहे व तसा स्वागत कार्यक्रमहि आखण्यात आला आहे.

तरी सर्व लोकांस विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी हजारोंच्या संख्येने व दिंड्या पताकांसहित हजर राहून हा कार्यक्रम यशस्वी करावा. रविवार दि. १०-५-१९६४ रोजी रात्रीं १२ वाजता सोरटा गावी हजर राहिल्यास सकाळच्या स्वागत कार्यक्रमाची व्यवस्था सुरळीतपणे करतां येईल.

विनीत

**श्री. नारायणराव डफडे,**

स्वागताध्यक्ष—

| | |
|---|---|
| (१) श्री. बाळकृष्णराव माजरखेडे | (२) श्री. रमेश जाचक |
| (३) ,, दिचकार पाटील | (४) ,, यादवराव माजरखेडे सरपंच |
| (५) ,, हरी शेंडे | (६) ,, माधवरावलोहकरे |
| (७) ,, नागोराव देवगडे | (८) ,, बाजीराव तराळ |
| (९) ,, मोतीरामपंधरे | (१०) ,, माधव सयाम |
| (११) ,, दमडुजी कांबळे | (१२) ,, केशव कोलाम |
| (१३) ,, देविदास उपसरपंच | |

**गं. भा. जाचक**

संपादक : श्री. गोपाळराव काळे, श्री. वसंतराव बोंबटकर,
प्रकाशक : श्री. वसंतराव बोंबटकर
मुद्रक : श्री. वामनराव पाचपांडे, नई तालीम मुद्रणालय, सेवाग्राम.
स्वामित्व : महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, मुंबई.

साम्ययोग : दैनिक पुरवणी ता. ४-५-६४ अं. ४९ र. नं. एन्. २९५
विनोबा वार्ता, सेवाग्राम जि. वर्धा (महाराष्ट्र राज्य)
श्री. ____________________

www.vinoba.in